CNR No.
**MHPU33-001095-2025**
MHPU330010952025



**विशेष खटला क्र. ९७/ २०२५**
**न्यायनिर्णय**

दाखल दिनांक – ३१/०३/२०२१
नोंदणी दिनांक – ०५/०४/२०२१
निकाल दिनांक – २०/०७/२०२६
कालावधी – ५वर्षे, ०२महिने, २०दिवस

**मा. अतिरिक्त सत्र न्यायाधीश साहेब, जुन्नर, जि.पुणे यांचे न्यायालयात**

**(पिठासिन अधिकारी श्री. एस. बी. शेलार यांचेसमोर)**

**विशेष खटला क्र. ९७/ २०२५**
**MHPU33-001095-2025**
**न्यायनिर्णय नि.२३**

**'अ' विभाग**

| **प्रथम खबरी अहवाल माहिती/ गुन्हा आणि पोलीस ठाणे** | |
|---|---|
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र, ओतूर पोलीस ठाणे, ता.जुन्नर, जि.पुणे<br>गु. र. क्र. ४६/२०२१ |
| तक्रारदार / फिर्यादी | **पिडीता**<br>रा. कोल्हेवाडी नं.२, ता.जुन्नर, जि.पुणे |
| अभियोगपक्षातर्फे | अतिरिक्त सरकारी अभियोक्ता<br>श्री. जी. के. खोडे |
| आरोपी | **मंगेश शिवाजी भालचिम**<br>वय – २४ वर्षे, व्यवसाय – शेती<br>रा. कोल्हेवाडी नं.२, ता.जुन्नर, जि.पुणे |
| आरोपी तर्फे विधीज्ञ | श्री. एन.एम.चौधरी |

**भाग 'ब'**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०३.०२.२०२१ व<br>०४.०२.२०२१ |
| प्रथम खबरी अहवाल | ०६.०२.२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल | ३१.०३.२०२१ |
| दोषारोप निश्चीत | २७.०९.२०२४ |
| पुराव्याची सुरुवात | ३०.०६.२०२६ |
| आरोपीचा कलम ३१३ फौ.प्र.संहिता प्रमाणे जबाब | --- |
| युक्तीवाद | २०.०७.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी राखुन ठेवलेली तारीख | २०.०७.२०२६ |
| न्यायनिर्णय घोषित | २०.०७.२०२६ |
| आरोपीच्या शिक्षेबाबत--- | लागू नाही. |

138

## आरोपीचा तपशील

| अ.क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप निश्चीत तारीख | दोषमुक्त केले किंवा शिक्षा सुनावली | शिक्षा काय दिली? | अटक झाल्यापासून न्यायनिर्णयापर्यंत आरोपी कारागृहात होता का? असल्यास कलम ४२८ फौ.प्र.सं. नुसार सुट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंगेश शिवाजी भालचिम | ०६.०२.२०२१ | — | २७.०९.२०२४ | दोषमुक्त केले. | लागु नाही. | लागु नाही. |

**आरोपीतर्फे साक्षीदार**

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**न्यायालयातर्फे साक्षीदार**

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**(अभियोगपक्षातर्फे / आरोपीतर्फे / न्यायालयातर्फे निशाणी दिलेल्याची यादी )**

**'अ' — अभियोगपक्षातर्फे**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| १. | १३/सा.क्र.१ | फिर्यादीवरील सही |
| २. | १४/सा.क्र.१ | प्रथम खबरी अहवालावरील सही |
| ३. | २१/सा.क्र.२ | जप्ती पंचनामा |

**'ब' — आरोपीतर्फे**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| १. | १५ | वैद्यकीय अहवाल (आरोपीतर्फे मान्य) |
| २. | १६ व १७ | कपडे जप्ती पंचनामा(आरोपीतर्फे मान्य) |

**'क' — न्यायालयातर्फे**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| १ | नाही | नाही |

**'ड' — महत्वाचे पुरावे**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| | नाही | नाही |

## न्यायनिर्णय

**(जाहिर दिनांक २० जुलै, २०२६)**

आरोपी विरूद्ध भारतीय दंड विधान कलम ३७६, ३५४ व ५०६ लैंगिक अपराधांपासुन बालकांचे सरंक्षण कायदा कलम ४ अन्वये खटला चालवण्यात आला.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की,**

२. दि.२८.०१.२०२१ रोजी रात्री १.०० वाजण्याचे सुमारास आरोपीने फिर्यादीचे घरात दारास जोरात धक्का देउन प्रवेश केला. त्याने फिर्यादीस त्याला तिच्याशी शरीरसंबंध ठेवायचे असल्याबाबत सांगितले. त्यामुळे फिर्यादीने आरोपीविरुध्द गु.र.क्र.३९/२०२१ दाखल केला. त्यानंतर दि.०३.०२.२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजण्याचे सुमारास फिर्यादी ही तिचे घराजवळ असलेल्या डोंगर पायथ्यावर ती सरपण तोडण्यासाठी गेलेली असताना आरोपी तिचेजवळ आला व तिला तिने दाखल केलेल्या गुन्हयाबाबत बोलू लागला. तसेच त्याने तिच्या हातातील कोयता हिसकावून घेवून तिला धाक दाखवून तिला कपडे काढावयास सांगून तिच्यासोबत जबरदस्तीने शरीरसंबंध केले. सदर बाब तिने आरोपीच्या भितीपोटी कोणालाही सांगितली नाही.

३. दि.०४.०२.२०२१ रोजी सकाळी ६.०० वाजण्याचे सुमारास ती खिरेश्वर ते पिंपळगाव जोगा रस्त्याने घरी येत असताना आरोपीने तिचा हात पकडला तेव्हा फिर्यादी त्याचा हात झटकुन घरी निघुन गेली. तिने सदर बाब तिचे पतीस सांगितली. त्यानंतर तिने आरोपीविरुध्द पोलीस ठाण्यात रितसर फिर्याद दाखल केली.

४. सदर फिर्यादीवरून पोलीसांनी आरोपी विरूद्ध गुन्हा र. क्र. ४६/२०२१ दाखल केला. तपासी अधिकारी श्री. पी.एच.कांबळे (सा.क्र.२) यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळ पंचनामा केला आणि आरोपीला अटक केली. तसेच पिडीतेस वैद्यकीय तपासणीकरिता पाठविले व वैद्यकीय अहवाल हस्तगत केला. तसेच इतर कागदोपत्री पुरावा गोळा करून तपासाअंती दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

५. निशाणी – ९ अन्वये आरोपी विरूद्ध आरोप निश्चित करण्यात

आले आणि सदर आरोप त्यास वाचून दाखविण्यात आला असता त्याने आरोप अमान्य असल्याचे सांगितले आणि खटल्याला सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

६. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरिता दोन साक्षीदार तपासले. परंतु सदर साक्षीदारांच्या साक्षीपुराव्यामध्ये आरोपीविरुध्द कोणतीही बाब आढळून न आल्याने आरोपीचा भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ३५१ प्रमाणेचा जबाब नोंदविण्यात आला नाही.

७. अभियोगपक्षातर्फे सरकारी अभियोक्ता श्री. जी. के. खोडे यांनी युक्तीवाद केला. आरोपीतर्फे श्री. चौधरी यांनी युक्तीवाद केला. अभियोगपक्षातर्फे सादर करण्यात आलेला लेखी व तोंडी पुरावा हा फौजदारी नियमावलीच्या भाग सहा च्या परिच्छेद ४४ (३) नुसार प्रस्तुत न्यायनिर्णयाच्या भाग 'क' मध्ये नमुद करण्यात आलेला आहे.

८. सरकारी अभियोक्ता यांनी असा युक्तिवाद केला की अभियोगपक्षातर्फे फिर्यादी/पिडीता (सा.क्र.१) हिला साक्षीदार म्हणून तपासण्यात आले असून तिने अभियोगपक्षाच्या केसप्रमाणे उत्तरे दिली नाहीत. सा.क्र.२ श्री.कांबळे (तपासी अधिकारी) यांनी आपण केलेल्या तपासाबाबत साक्ष दिलेली आहे. त्यांनी आरोपीला ओळखलेले आहे. तसेच फिर्यादी व साक्षीदारांचे जबाब त्यांचे सांगण्यानुसार नोंदविल्याचे आपल्या साक्षीदरम्यान सांगितलेले आहे. सरकारी अभियोक्ता यांनी असा युक्तीवाद केला की, तपासी अधिकारी (सा.क्र.२) यांनी सक्षम पुरावा देउन आरोपीविरुध्द सगळे गुन्हे सिध्द केलेले आहेत. त्यामुळे पोक्सो कलम २९ प्रमाणे गृहीतक वापरुन आरोपीला शिक्षा करण्यात यावी. आरोपीचे वकील श्री. चौधरी यांनी असा युक्तिवाद केला की, अभियोगपक्षाने केस सिध्द केलेली नाही. साक्षीदार क्र. १ पिडीता/फिर्यादी हिने अभियोग पक्षास अनुसरून उत्तरे दिलेली नाहीत. केस मध्ये इतर कोणी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासलेले नाहीत. त्यामुळे तिची साक्ष ग्राहय धरता येणार नाही. त्यामुळे कोणतेही गुन्हे सिध्द होत नाहीत. सबब आरोपीला केस मधून निर्दोष सोडण्यात यावे अशी त्यांनी विनंती केली.

९. खटल्याच्या निवाड्याकरीता पुढील मुद्दे माझ्या विचाराधीन असून, त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसे सहित खालीलप्रमाणे मी नमूद करीत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, आरोपीने अज्ञान पिडीत मुलीवर बलात्कार केला? | नाही. |
| २. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, आरोपीने अज्ञान पिडीत मुलीवर फौजदारीपात्र बलप्रयोग करुन तिचा विनयभंग केला? | नाही. |
| ३. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, आरोपीने फिर्यादीवर फौजदारीपात्र धाकदपटशा केला? | नाही. |
| ४. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, आरोपीने अज्ञान पिडीत मुलीवर प्रवेशजन्य लैंगिक अत्याचार केला? | नाही. |
| ५. | आदेश काय? | आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## कारणमिमांसा

### मुद्दे क्र. १ ते ५ करिता —

१०. मुद्दा क्र. १ ते ५ हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे विवेचनासाठी व सोयीसाठी एकत्रीतरित्या व एकाच वेळेस चर्चेकरिता घेण्यात येत आहेत. आरोपीने घ टनास्थळ पंचनामा, पिडीतेचा वैद्यकीय अहवाल व कपडे जप्ती पंचनामा हे मान्य केलेले आहेत.

११. साक्षीदार क्र. १ पिडीता हिच्या पुराव्यात तिने ती आरोपीस ओळखत नसल्याबाबत सांगितले आहे. तसेच तिला घटनेबाबत आठवत नसल्याबाबत सांगितले आहे. त्याचप्रमाणे आरोपीने दि.०३.०२.२०२१ रोजी तिच्यासोबत जबरदस्तीने शरीरसंबंध केल्याबाबत व दि.०४.०२.२०२१ रोजी आरोपीने तिचा हात पकडल्याची बाब तिने नाकारली आहे. तसेच फिर्याद व प्रथम खबरी अहवालावरील सही फकत तिने ओळखली आहे व त्यातील मजकुर तिला माहित नसल्याबाबत सांगितले आहे. आरोपीने कोणतेही अपकृत्य केल्याचे तिने नाकारले आहे. तसेच आरोपीने तिच्याविरुध्द कोणताही गुन्हा केला नसल्याबाबत सांगितले आहे.

१२. साक्षीदार क्र. २ पी.एच.कांबळे हे गुन्हयाचे तपासी अधिकारी असून त्यांनी त्यांचे साक्षीपुराव्यादरम्यान त्यांनी केलेल्या तपासाबाबत सांगितले आहे. त्यांचे

तपासादरम्यान आरोपीविरुध्द सबळ पुरावे आढळून आल्याने त्यांनी त्याचे विरुध्द दोषारोपपत्र दाखल केल्याचे त्यांनी सांगितले आहे.

१३. सदर केसमध्ये साक्षीदार क्र. १ हिच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, तिने फिर्याद व प्रथम खबरी अहवालाप्रमाणे घटनेबाबत कोणताही पुरावा दिलेला नाही. त्यामुळे झालेली घटना व आरोपीविरुध्द दोष सिध्द करण्यामध्ये सरकारपक्षास अपयश आलेले आहे. नि.१५ फिर्यादीचा वैद्यकीय अहवाल तपासला असता त्यातून असे निष्पन्न होते की आरोपी आणि तिच्यामध्ये ५ वर्षापासून संबंध होते. सदर बाब ही तिने दिलेल्या फिर्यादीच्या विरुध्द आहे. त्यामुळे तिचा पुरावा विश्वासयोग्य वाटत नाही. त्यामुळे कोणताही आरोप आरोपीविरुध्द सिध्द झालेला नाही व तो सदर केसमध्ये निर्दोष सुटण्यास पात्र आहे. सदर साक्षीदाराचा पुरावा हा अभियोगपक्षास कोणत्याही उपयोगाचा नाही. सदर साक्षीदाराने केसबाबत किंवा आरोपीविरुध्द कोणताही संयुक्तीक पुरावा दिलेला नाही. त्यामुळे या साक्षीदाराच्या पुराव्याच्या आधारावर अभियोगपक्ष कोणतेही आरोप सिध्द करु शकलेला नाही.

१४. वरील साक्षीदारांव्यतिरिक्त अभियोगपक्षाने इतर कोणताही साक्षीदार तपासलेला नाही. त्यामुळे अभियोग पक्षाच्या साक्षीदाराचा पुरावा पूर्ण व विश्वासयोग्य वाटत नाही. आरोपीविरूध्दचा दोषारोप नि:संशयपणे शाबीत करण्याची जबाबदारी पूर्णत: अभियोगपक्षाची आहे. असे तत्व विशेषत: फौजदारी न्यायदान प्रक्रियेमध्ये स्थिरावलेले आहे. प्रस्तुत प्रकरणी दाखल झालेला तोंडी व लेखी पुरावा बारकाईने पडताळला असता असे दिसून येते की, तसा नि:संशय शाबीतीचा पुरावा प्रस्तुत आरोपीविरूध्द याकामी दाखल झालेला नाही.

१५. साक्षीदाराच्या पुराव्याचे व अभिलेखावर असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता, अभियोगपक्ष आरोपीविरूध्द कोणताही आरोप सिध्द करू शकलेला नाही. अभियोग पक्षाचा पुरावा संशयास्पद वाटतो व त्यामुळे आरोपीविरूध्दचे गुन्हे सिध्द होत नाहीत. सदर केसमध्ये पिडीता हिने तिच्याविरुध्द कोणताही गुन्हा न झाल्याचा पुरावा न्यायालयासमक्ष दिलेला आहे. त्यामुळे तिला कोणतीही नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. त्यामुळे तिला नुकसान भरपाई नाकारण्यात येत आहे. सदर केसमधील जप्त मुददेमाल, आरोपी व पिडीतेचे कपडे पोलिसांनी खटल्याकामी जप्त केलेले आहेत. सदर जप्त मुददेमाल हा निरुपयोगी असल्याने अपीलाचा कालावधी

संपल्यानंतर नष्ट करण्यात यावा. तसेच प्रस्तुत गुन्हयातील जप्त मुददेमाल एक लाकडी मुठ असलेला लोखंडी कोयता हा डिस्ट्रीक्ट मॅजिस्ट्रेट यांचेकडे विल्हेवाट लावण्यासाठी पाठविण्यात यावा किंवा त्यांनी न स्विकारल्यास तो अपीलाचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर नष्ट करण्यात यावा. वरील चर्चेचा निष्कर्ष असा की आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. त्यामुळे मुद्दे क्र. १ ते ४ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येते व मुद्दा क्र.५ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी नामे **मंगेश शिवाजी भालचिम** यास भारतीय दंड विधान कलम ३७६, ३५४ व ५०६ व लैंगिक अपराधांपासुन बालकांचे सरंक्षण कायदा कलम ४ अन्वये च्या अपराधांमधून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २५८ (१) प्रमाणे निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचे बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येत आहेत. |
| ३. | भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४८१ प्रमाणे आरोपीने त्याचा वैयक्तिक जात मुचलका व जामीन ₹. २५,०००/— (अक्षरी रु.पंचवीस हजार) हजर करावा. |
| ४. | सदर केसमधील जप्त मुददेमाल, आरोपी व पिडीतेचे कपडे पोलिसांनी खटल्याकामी जप्त केलेले आहेत. सदर जप्त मुददेमाल हा निरुपयोगी असल्याने अपीलाचा कालावधी संपल्यानंतर नष्ट करण्यात यावा. तसेच सदर केसमधील जप्त मुददेमाल एक लाकडी मुठ असलेला लोखंडी कोयता हा डिस्ट्रीक्ट मॅजिस्ट्रेट यांचेकडे विल्हेवाट लावण्यासाठी पाठविण्यात यावा किंवा त्यांनी न स्विकारल्यास तो अपीलाचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर नष्ट करण्यात यावा. |
| ४. | भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४०६ प्रमाणे सदर न्यायनिवाडयाची प्रत डिस्ट्रीक्ट मॅजिस्ट्रेट, पुणे यांना पाठविण्यात यावी. |

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात.आला.

20/07/2026

दिनांक २०.०७.२०२६

(सु.भा.शेलार)
विशेष न्यायाधीश (पोक्सो), जुन्नर, जि.पुणे

भाग 'क'

(अभियोगपक्षातर्फे / आरोपीतर्फे / न्यायालयातर्फे साक्षीदारांची यादी )

| अभियोपक्षातर्फे साक्षीदार | | | |
|---|---|---|---|
| साक्षीदार क्र. | नाव | निशाणी क्र. | पुराव्याचा प्रकार |
| १ | पिडीता | १२ | पिडीता / फिर्यादी |
| २ | पी.एच.कांबळे | २० | तपासी अधिकारी |

20/07/2026

दिनांक २०.०७.२०२६

(सु.भा.शेलार)
विशेष न्यायाधीश (पोक्सो), जुन्नर, जि.पुणे